# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १९/०९/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. जलालखेडा** :— दिनांक ०४/०४/२०२२ चे १४:०० वा. ते माहे जुन २०२२ पर्यंत वय १८ वर्षीय पीडित/फिर्यादी हि अल्पवयीन असतांना आरोपी नामे— सुरज नथ्थुजी नाडेकर, रा. मोहगाव, ता.सौंसर जि.छिंदवाडा (एमपी) याने तीचेशी जबरजस्तीने शारीरिक संबध केले. तसेच नमुद पीडीत हि झालेल्या शारीरिक संबधामुळे गर्भवती राहली दरम्यान आरोपीने पुन्हा जुन २०२२ मध्ये पीडितचे घरी तीचेसोबत जबरजस्तीने शारीरिक संबध केले. दि.१६/०९/२०२२ रोजी पीडित हिने गर्भपात करणेकरीता गोळया घेतल्यावरुन तिला त्रास होत असल्याने तीला प्राथमीक आरोग्य केन्द्र जलालखेडा येथे तीचे नातेवाईक यांनी नेले असता तीचे गर्भपात झाले. वैदयकीय अधिकारी यांनी दिलेल्या अहवाल तसेच पीडित हिचे यासंबधाने नोंदविण्यात आलेल्या बयाणानुसार पीडित हिचेसोबत नमुद आरोपी याने ती अल्पवयीन असतांना जबरजस्तीने शारीरिक सबंध केल्याने व तीचे गर्भपात करून तिचेवर लैंगीक अत्याचार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२)(एन)भादंवि. सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी मो.नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. मौदा** :— दिनांक १४/०९/२०२२ चे १०.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १५ वर्ष पिडीता हि तिच्या लहान बहीनी सोबत शाळेत जात असतांना दिगांबर यांचा शेता जवळ एक अज्ञात मुलगा(आरोपी) हा बसलेला होता. दिगांबर यांच्या शेता समोर पाणी साचल्याने पीडिता हिने व तिचा बहीनीने पायाचे बूट काढले व पाणी ओलांढला. पीडिता व तिची बहीन पायात बुट घालण्यासाठी खाली वाकली असता मागून अज्ञात आरोपी आला व पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ) भादंवी. सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मलकुरवार मो.नं. ९६२३६८७३२७ या करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. कन्हान :–** अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील एस.बी.आय चे ए.टी.एम कन्हान येथे दिनांक १८/०९/२०२२ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पुंडलीक केशवराव इंगोले, वय ६३ वर्ष, रा. वार्ड नं. ४ श्रीकृष्ण मंदीरचे जवळ टेकाडी कन्हान ता. पारशिवनी ड.ब्लु.सि.एल हे आपले पत्नीसह नागपुर ला जात असता कन्हान येथीन एस.बी.आय चे ए.टी.एम मधुन पैसे काढण्याकरीता गेले असता ए.टी.एम. मध्ये असलेला अज्ञात आरोपीने फिर्यादीचा ए.टी.एम हातचलाखीने घेवुन गेला. फिर्यादीने बाहेर येवुन आरोपीचा शोध घेतला असता मिळुन आला नाही. त्यानंतर फिर्यादीच्या मोबाईल वर मॅसेज आला की, 'आपल्या खात्यातुन ७४,०००/–रु. डेबीट झाले आहे' फिर्यादीने त्यांचा पुतन्याला घटनास्थळी बोलवुन हकीकत सांगीतले असता फिर्यादीच्या पुतन्याने ए.टीएम कार्ड ब्लॉक केले. अज्ञात आरोपीने हातचलाखीन फिर्यादीचे एस.बी.आय चे ए.टी.एम कार्ड घेवुन जावुन ७४,०००/–रु. चे ट्रान्जेक्शन करुन एकुण ७४,०००/–रु. काढुन घेत फिर्यादीची फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रशांत रामटेके मो.नं. ९५१८९०३४८८ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत सावनेर ते छिंदवाडा रोड वरील हायवे रोडच्या खाली सावनेर येथे दिनांक १७/०९/२२ चे २३.३० वा. ते दिनांक १८/०९/२२ चे ०७.०० वा. सुमारास भरत उर्फ जय रामकिशन बघेल (मृतक), वय ३२ वर्षे, रा. भारतरत्न विद्यालय परीसर कबीर वार्ड डुन्डा शिवनी जिल्हा शिवनी राज्य मध्यप्रदेश हा त्याचा मामा मरण पावल्याने तो शिवनी येथे जाण्याकरीता सावनेर ते छिंदवाडा रोड वरील हायवे रोडच्या खाली उभा असता अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकास धडक दिली. या अपघतात भरत बघेल हे गंभीररीत्या जखमी होउन त्योचा मृत्यु झाला व आरोपी हा तेथुन वाहन घेवून पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरज ब्रिजमोहन तिवारी, वय २८ वर्षे रा. फेटरी वार्ड क्र ३ सावनेर नागपूरयांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक दोनोड मो क्र ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**